सं. फौजदारी प्रकरण क्र. ७८१/२०२२

महाराष्ट्र सरकार –वि– योगेश

निशाणी क्र. ३३

सरकार तर्फे साक्षीदार क्र. ०६

मी याद्वारे शपथपुर्वक निवेदन करतो की,

माझे नावः पंजाब

वडीलांचे नावः माणिकराव

आडनावः मिसाळ

माझे वयः ३२ वर्ष, व्यवसायः शेती,

राहणारः रेलगाव, ता. भोकरदन, जि. जालना.

**सरतपासणी सरकारी वकिल श्री. ए. एन. गवळी यांच्याद्वारे**

०१. मी इयत्ता तिसरीपर्यंत शिकलेलो आहे. पोलीसांनी माझी चौकशी केली होती परंतु मी काही माहित नसल्याचे त्यांना सांगितले होते.

**साक्षीदार अभियोगपक्षाच्या कथनास पुरक साक्ष देत नसल्याने अभियोगपक्षातर्फे विधीज्ञांनी साक्षीदारास भारतीय साक्ष अधिनियम कलम १४८ व कलम १५७ अन्वये प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. सदरची परवानगी दिली.**

०२. साक्षीदारास त्याच्या दिनांक ३०.०७.२०२२ रोजीच्या जबाबातील नमुद अधोरेखांकीत भाग 'अ' वाचुन दाखविण्यात आला. सदर अधोरेखांकीत भागामध्ये नमुद केल्याप्रमाणे घटना घडली होती अगर कसे हे सांगता येणार नाही असे साक्षीदाराने सांगितले. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या जमीनीचा गट क्र. ३७७ आहे व मी माझी जनावरे शेतामध्ये बांधतो. मी महादु मिसाळ यास ओळखतो. मी योगेश गायकवाड याला ओळखत नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी हा माझ्या परिचयाचा असल्याने त्यास शिक्षा होऊ नये यासाठी खोटी साक्ष देत आहे.

सरतपास पुर्ण

**उलटतपास आरोपींतर्फे विधीज्ञ श्री. पी. टी. शिरसाट यांच्याद्वारे नाकारला.**

श्रवणोत्तर स्वीकृत

स्वाक्षरीत/-

दिनांकः १५.०७.२०२५

(मयुरेश आर. काळे)

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, भोकरदन